# **<u>प्रेस नोट</u>**

**आलोसे श्री. रमेश मारोतराव टाकरस वय ५० वर्ष पद- उपकृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सालेकसा ता.सालेकसा जि.गोंदिया राह. रुम नं.६१२ बी. प्रसाद पॅलेस न्यु सुभेदार लेआउट, उदयनगर, नागपूर ता.जि.नागपूर. ह.मु. श्री.संजय वलथरे यांचे घरी किरायाने बाजार चौक सालेकसा ता.सालेकसा जि.गोंदिया यांनी लाच रक्कम ५०००/-रु. मागणी करुन, स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडुन कार्यवाही केलेबाबत.**

यातील तक्रारदार यांचेकडे ५ एकर शेती असून, शेतीचे काम करण्यासाठी त्यांच्याकडे ट्रॅक्टर आहे. तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा मार्फत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY वैयक्तिक लाभार्थी योजना २.०) अंतर्गत शेतीचे कामे करण्यासाठी ट्रॅक्टरचे रोटावेटरची केंद्र शासनाची योजना असून सदर योजने अंतर्गत रोटावेटरला शासनाचे ४०,०००/- रु. अनुदान मिळणार असल्याने व त्यांना रोटावेटरची आवश्यकता असल्याने त्यांनी दिनांक १७.०६.२०२५ रोजी शिव ॲग्रो गोंदिया येथून १,०५०००/-रुपये किंमतीचा रोटावेटर विकत घेतला. तक्रारदार यांनी ग्रामपंचायत कार्यालय येथून सदर योजनेचा फॉर्म उपलब्ध करुन घेवून तो भरुन, त्यासाठी लागणारे कागदपत्र व रोटावेटर खरेदी केलेले जिएसटी बील त्यासोबत जोडून तक्रारदार यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय सालेकसा येथे सहा महिण्यापूर्वी दाखल करण्यासाठी गेले असता आरोपी लोकसेवक श्री.रमेश टाकरस, उपकृषी अधिकारी सालेकसा यांनी तक्रारदार यांचा फॉर्म दाखल करुन घेवून रोटावेटरचे ४०,०००/-रुपयाचे अनुदान मिळण्यासाठी १०,०००/-रुपये दयावे लागतील, असे सांगीतले. तक्रारदार यांनी माझ्याकडे पैसे नसल्याबाबत सांगीतले असता, आरोपी लोकसेवक रमेश टाकरस यांनी बील मंजूर झाल्यावर १०,०००/- रुपये दयावे लागतील, असे तक्रारदार यांना म्हणाले.

दिनांक १२.१२.२०२५ राजी रोटावेटरचे अनुदानाचे ४०,०००/- रुपये कधी येणार हे विचारण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे तक्रारदार गेले असता आरोपी लोकसेवक श्री. रमेश टाकरस यांनी रोटावेटरचे ४०,०००/- रुपये अनुदान आठ दहा दिवसात मिळुन जाईल असे सांगुन मंजुर झाल्यावर १०,०००/- रुपये आणून दया असे म्हणाले दिनांक १८.१२.२०२५ रोजी रोटावेटरचे ४०,०००/- रुपयाचे अनुदान तक्रारदार यांचे बॅकेच्या खात्यात जमा झाल्यानंतर दोन तिन दिवसांनी आरोपी लोकसेवक श्री.रमेश टाकरस यांचे कार्यालयाबाहेर तक्रारदार यांची भेट झाली असता, त्यांनी ठरल्याप्रमाणे १०,०००/-रुपये आणुन दया असे म्हणाले. आरोपी लोकसेवक यांनी दिनांक १२.०१.२०२६ रोजी १०,०००/- रुपये घेवून तक्रारदार यांना बोलावले असल्याने व तक्रारदार यांना ती लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १२.०१.२०२६ रोजी सापळा अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया यांना फोन दवारे कळविले होते.

सदर तक्रारीवरुन दिनांक १२.०१.२०२६ रोजी सापळा अधिकारी यांनी दोन पंचासह सालेकसा येथे जावून तक्रारदार यांची तक्रार घेवून दिनांक १२.०१.२०२६ व दिनांक १६.०१.२०२६ रोजी आरोपी लोकसेवक यांची लाच मागणी पडताळणी कार्यवाही केली असता, आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना रोटावेटरचे अनुदान मंजूर करुन काढून दिल्याचे मोबदल्यात ५,०००/- रुपयाची लाचेची मागणी पंचासमक्ष करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविली.

दिनांक १६.०१.२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. रमेश टाकरस, उपकृषी अधिकारी सालेकसा यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदार यांची

रोटावेटरचे ४०,०००/-रुपये चे अनुदान मंजूर करुन काढून दिल्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांच्या कडून ५,०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारुन गैरफायदा घेतला. आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन सालेकसा जि. गोंदिया कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ (संशोधन अधिनियम-२०१८) अन्वये गुन्हा नोंद करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. डॉ. दिगंबर प्रधान पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. नागपुर, मा.श्रीमती माधुरी बाविस्कर मॅडम, अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि. नागपुर, मा.श्री. विजय माहुलकर अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात पो.नि.उमाकांत उगले, पो.नि.अरविंद राऊत, स.फौ. चंद्रकांत करपे, पो.हवा. संजय बोहरे, पो.हवा मंगेश कहालकर, ना.पो.शि. संतोष शेंडे, अशोक कापसे, संतोष बोपचे, प्रशांत सोनवाने,कैलास काटकर चालक नापोशि दिपक बाटबर्वे सर्व लाप्रवि.गोंदिया यांनी केली.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांची लोकसेवका विरुध्द तक्रार असल्यास त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे खालील माध्यमाद्वारे संपर्क करावा. त्यांच्या तक्रारीची योग्य ती दखल घेण्यात येईल.

Toll Free No :-1064
Landline No :- 07182/251203
Whatsapp No:- 9664959090
Email Id :- acbgondia@gmail.com

(उमाकांत उगले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया